**अमरावती महानगरपालिका, अमरावती**
**दिनांक 01.6.2023 रोजी प्राप्त प्रशासकीय विषय**

**(प्रशासकीय विषय)**

**विषय क्रमांक 85 -** शहरी आरोग्य केंद्र जिल्हा स्त्री रुग्णालय मसानगंज येथे स्थलांतरण करणे बाबत.

**ठराव क्रमांक 85 -** उपरोक्त विषयास अनुसरून, अमरावती महानगरपालिका कार्यक्षेत्रा अंतर्गत शहरी आरोग्य केंद्र जिल्हा स्त्री रुग्णालय येथील कर्मचारी 2 रूममध्ये कामकाज करीत होते. परंतू शहरी आरोग्य केंद्राच्या कामकाजाकरीता NUHM norm नुसार 2 रूम अपुरे पडत होते. तरी जिल्हा स्त्री रूग्णालय कामकाजाच्या दृष्टीने इतरत्र स्थलांतरण करावे लागण्याची गरज भासल्या कारणाने व त्या अनुषंगाने दि. 03/04/2023 रोजी मा.अतिरिक्त आयुक्त व वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांनी मनपा दवाखाना मसानगंज येथे पाहणी केली. सदर मनपा दवाखाना मसानगंज येथे शहरी आरोग्य केंद्राकरीता पुरेसी जागा उपलब्ध आहे.

तरी शहरी आरोग्य केंद्र जिल्हा स्त्री रुग्णालयाचे स्थलांतरण मनपा दवाखाना मसानगंज येथे करावे लागेल. त्या अनुषंगाने, जिल्हा स्त्री रुग्णालय शहरी आरोग्य केंद्राचे स्थलांतरण मनपा दवाखाना मसानगंज येथे करण्याकरीता व शहरी आरोग्य केंद्र मसानगंज असे नाव करण्याकरीताच्या प्रस्तावास व शासनास पाठविणेकरीता सर्वसाधारण सभेमध्ये मान्यता प्रदान करावी.

या नुसार उपरोक्त प्रशासकीय विषय सर्वसाधारण सभेचे मंजुरी करिता सादर करण्यात आला आहे. परंतु, सद्यस्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रशासकीय विषयास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव मंजुर व कायम

**स्वा./-**
**नगरसचिव,**
**महानगरपालिका,अमरावती**

**स्वा./-**
**प्रशासक,**
**महानगरपालिका,अमरावती**

नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती